रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

'विधी'-लिखित
कायदेविषयक जनजागृतीसाठी
महाराष्ट्र राज्य महिला
आयोगाची पुस्तकमालिका
७

# प्रसूतिपूर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायदा



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा



विजया रहाटकर

सदस्य



नीता राजेंद्र ठाकरे

सदस्य



गयाताई शिवाजीराव कराड

सदस्य



देवयानी ठाकरे

सदस्य



विंदा कीर्तीकर

सदस्य



ॲड. आशा लांडगे

पदसिद्ध सदस्य



सतीश माथूर
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव



डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे




सत्यघटनांवर आधारलेल्या या पुस्तकातील कथांमधून आपल्याला सध्याच्या समाजाचे वास्तवदर्शी चित्रण पाहायला मिळते. आजच्या आधुनिक जगात वावरतानाही महिलांना शारीरिक- मानसिक त्रासाला, आर्थिक फसवणुकीला कशाप्रकारे सामोरे जावे लागते, हे या कथांमधून समजते. मात्र, त्याचवेळी महिलांनी हातपाय गाळून न बसता स्वत:च्या गुणवैशिष्ट्यांप्रमाणे हर एक प्रसंगाला निडरतेने कसे सामोरे जायला हवे, हेदेखील या कथा सांगतात. राज्य महिला आयोगाचा आधार घेतल्यास कुठेही वाच्यता न होता कठीण प्रसंगातूनही कसा मार्ग काढता येतो, हे दाखविले जाते. महिला आयोग हे महिलांचे जणू हक्काचे माहेरच आहे. कुठल्याही प्रसंगात महिला आयोग साथ देईल, याची जाणीव हे पुस्तक करून देते.

***नुकतेच प्रकाशित झालेले हे पुस्तक हवे असल्यास आयोगाशी संपर्क साधा.**

**फोन : ०२२-२६५९०८७८**

**किंमत १०० रुपये**

**'विधी'-लिखित**
कायदेविषयक जनजागृतीसाठी
महाराष्ट्र राज्य महिला
आयोगाची पुस्तकमालिका
**७**

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
म्हाडा भवन, कलानगर,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
दूरध्वनी (०२२) - २६५९०७३९

**मुखपृष्ठ, मांडणी**
साहिल पब्लिकेशन
सुनील पाटील, वंदन पाटील
आनंदनगर, सिंहगड रोड.
९९२२९१३५८०, ९०११०८७४२९

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परेल, मुंबई–१३

**प्रथम आवृत्ती**
मे २०१८

**किंमत**
**संपूर्ण पुस्तक संच : १०० रूपये**
**प्रति पुस्तक : १० रूपये**



**महत्वाची सूचना :**
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तिकेत सर्वसामान्यांना, विशेषतः महिलांना कायद्याची माहिती सुलभ भाषेत व्हावी, यासाठी हा मजकूर प्रकाशित करण्यात आला आहे. हा मजकूर म्हणजे मूळ कायद्याचा शब्दशः तर्जुमा नव्हे. कुठल्याही कायद्याचा अर्थ, अन्वयार्थ यासाठी मूळ इंग्रजी मसुदा व त्याचा अर्थच ग्राह्य धरला जाईल, याची वाचकांनी व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**– प्रकाशक**



# भूमिका

**प्रिय मैत्रिणींनो,**
**सस्नेह नमस्कार,**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने प्रकाशित **'विधी' लिखित** या मालिकेतील ही सातवी पुस्तिका आपल्या हातात देताना मला मनःपूर्वक आनंद होत आहे. आपल्या देशात महिलांच्या हितासाठी अनेक कायदे केले गेले आहेत. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून काही कायदे अस्तित्वात आहेत. काळानुरूप त्यात बदलही होत गेले आहेत. देश स्वतंत्र झाल्यानंतर आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाने लिहिलेली आदर्श अशी राज्यघटना उपलब्ध झाली. आपल्या संसदेने या घटनेच्या मूळ तत्त्वांचा आधार घेत, महिलांच्या कल्याणासाठी अनेक नवे कायदेही केले. वेळोवेळी त्यात सुधारणा करण्यात आल्या. या सर्व कायद्यांची माहिती महिलांना असावी, यासाठीच सुलभ मराठीत त्या आणण्याचा हा आयोगाचा प्रयत्न आहे.

देश स्वतंत्र होऊन सत्तर वर्षे उलटून गेली असली आणि आपण आज एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात असलो, तरी महिलांवरील अत्याचारांमध्ये, अन्यायामध्ये वाढच होताना दिसते आहे. आईच्या गर्भातच स्त्रीचा भ्रूण खुडण्यापासून या अन्यायाला सुरुवात होते. जन्माला आल्यापासून ते मृत्यूपर्यंत स्त्री वेगवेगळ्या टप्प्यांवर अनेक अत्याचार सहन करीत असते. जवळच्या आप्तांकडून होणाऱ्या बलात्कारासारख्या घृणास्पद कृत्यापासून ते कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापर्यंत तिला या अन्यायाला सतत तोंड द्यावे लागते. असमानतेची वागणूक, हुंड्यासाठी छळ, सासरी होणारी घुसमट, समाजात वावरताना स्त्री म्हणून सतत असुरक्षिततेची जाणीव, समाजाच्या योनीशुचितेच्या अवास्तव कल्पना आणि त्यातून उद्भवणारे वेगळेच अत्याचार अशा अनेक प्रकारांनी महिलांचा अनन्वित छळ होत असतो. काही ठिकाणी तर कल्पनेपलीकडे भयंकर अशा स्वरूपाचे हे अत्याचार होताना दिसतात.

एक जबाबदार लोकशाही देश म्हणून स्त्रीला समानतेची, आदराची, सन्मानाची वागणूक देणे हे आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यात कुचराई होत असेल, तर आपल्या न्यायव्यवस्थेकडे दाद मागण्याची सोय आपल्याला उपलब्ध आहे. आपल्यासाठी कोणते कायदे आहेत आणि त्यांचा काय उपयोग आहे हे अनेकदा महिलांनाच माहिती नसते. या पुस्तिकांद्वारे किमान माहितीची ही उणीव दूर होईल, अशी आशा आहे. शक्यतो कायद्यांचा उपयोग करायची वेळ कुणावर येऊ नये, ही इच्छा आहे. मात्र, वेळ पडलीच तर महिलांनी याही आघाडीवर आपण सक्षम आणि निर्भय आहोत, हे दाखवून द्यावे, हाच या पुस्तिकांच्या प्रकाशनामागचा हेतू आहे.

या सातव्या पुस्तिकेत **'प्रसूतिपूर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायदा'** याचा सविस्तर परिचय करून देण्यात आला आहे. तो आपल्याला उपयुक्त वाटेल, अशी आशा करते.



**विजया रहाटकर,** अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई



# अमानवी वृत्ती रोखण्यासाठी...

भारतात बहुतांश राज्यांत पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा आहे. त्या पगड्यातून आलेली सामाजिक विकृती म्हणजे मुलीचा गर्भ नाकारणे. आपल्या पोटी मुलगाच जन्माला यावा, अशी कित्येक दाम्पत्यांची इच्छा दिसते. त्यामुळे मुलीचा गर्भ असेल, तर बेकायदा गर्भपात करून स्त्री–भ्रूणहत्या केली जाते. हे प्रमाण वाढल्यानंतर सरकारने १९९४ मध्ये आपल्या देशात 'गर्भधारणापूर्व आणि प्रसूतिपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निदान प्रतिबंध) कायदा' (प्री–कन्सेप्शन अँड प्री–नेटल डायग्नोस्टिक टेक्निक्स – पीसीपीएनडीटी – कायदा) करण्यात आला.

गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्वी गर्भलिंग जाणून घेण्यास आणि निवडण्यास या 'गर्भधारणापूर्व आणि प्रसूतिपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निदान प्रतिबंध) कायद्या'न्वये (पीसीपीएनडीटी) प्रतिबंध घालण्यात आले आहेत. या कायद्याच्या नावामध्येच कायद्याचा हेतू स्पष्ट झाला आहे.

'गर्भजल व गर्भलिंगनिदान तंत्र (नियमन व गैरवापर प्रतिबंध) कायदा, १९९४' या कायद्यात २००३मध्ये सुधारणा करून त्याचे नवे नाव 'गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निदान प्रतिबंध) कायदा' (पीसीपीएनडीटी) असे करण्यात आले आहे. गर्भलिंगनिदान व गर्भनिवड करण्यास या कायद्याद्वारे मनाई करण्यात आली आहे. गर्भाचे निदान करून, तो गर्भ मुलीचा असल्यास गर्भपाताद्वारे तो काढून टाकण्याच्या अमानवी प्रकारावर वचक बसवण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. असे बेकायदा कृत्य करणाऱ्या डॉक्टरांवर खटला भरण्यात येतो व पुराव्यासह सिद्ध झाल्यास त्याला शिक्षा ठोठावण्याची तरतूद आहे.

## मुलींचे घटते प्रमाण

भारतात २००१ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषांमागे ९३३ स्त्रिया असे प्रमाण होते. ०–६ वयोगटासाठी हेच प्रमाण दर हजार मुलींमागे ९२७ मुली असे आहे. महाराष्ट्रात तर हे प्रमाण ९१३ इतके कमी आहे. देशातील आर्थिकदृष्ट्या विकसित मानल्या जाणाऱ्या पंजाब, हरियाणा, दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये मुलींची संख्या झपाटयाने कमी होत आहे. त्यातही आर्थिक सुबत्ता असणाऱ्या शहरी भागांमधून मुला–मुलींचे लिंग गुणोत्तर जास्तच विषम होत चालले आहे. पूर्वी गर्भजलपरीक्षा आणि आता अल्ट्रासाउंड सोनोग्राफीच्या तंत्रज्ञानाचा गर्भाचे लिंग जाणून घेसाठी मोठ्या प्रमाणावर होणारा गैरवापर आणि त्यानंतर मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात, तसेच एकूणच मुलगी म्हणून केले जाणारे दुर्लक्ष या सर्व कारणांमुळे मुलींची संख्या वेगाने कमी होत चालली आहे.

महाराष्ट्रात विकसित समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यांमध्येच मुलींची संख्या कमी होत आहे. ज्या भागात आर्थिक विकास झाला, कारखानदारी आली आणि लोकांच्या हातात थोडा फार पैसा आला, तेथेच सोनोग्राफीचे तंत्रज्ञान घेऊन डॉक्टर पोचले आहेत आणि परिणामी लिंगनिदान आणि मुलीचे गर्भपात मोठया प्रमाणावर होत आहे.

याला प्रतिबंध म्हणून हा कायदा करण्यात आला आहे.

## गर्भलिंगनिवड म्हणजे काय?

गर्भधारणेच्या किंवा प्रसूतीच्या आधी गर्भाचे लिंग जाणून घेणे आणि मुलीचा गर्भ असेल तर गर्भपात करणे म्हणजे गर्भलिंग निवड.

पुरुषप्रधान समाजात मुली आणि स्त्रियांना असणारे दुय्यम स्थान आणि मुलींबाबत केला जाणारा भेद हेच यामागील मूळ कारण आहे. मुलाच्या हव्यासापायी सोनोग्राफीच्या तंत्रज्ञानाचा वापर गर्भाचे लिंग जाणून घेण्यासाठी केला जातो आणि मुलीचा गर्भ असेल तर तो पाडला जातो.

काही जण याची अशीही पाठराखण करतात, की समाजात मुली कमी असल्या तर त्यांचे स्थान उंचावेल; पण प्रत्यक्षात मुलींची संख्या कमी झाली तर त्यांच्यावरील बंधने अजूनच वाढतील. तसेच, अपहरण, हिंसा आणि बलात्काराच्या घटनाही वाढतील. एका बाईशी एकाहून अधिक पुरुषांनी लग्न करण्याच्या जुन्या प्रथाही परत सुरू होऊ शकतील. देशाच्या काही भागांत लग्नासाठी मुली मिळत नसल्यामुळे महिलांची राजरोस विक्री केली जात आहे, अशाही बातम्या प्रसारमाध्यमांमध्ये येऊ लागल्या आहेत.

कायद्याने गर्भधारणेआधी आणि प्रसूतीआधी गर्भलिंगनिदान करण्यावर बंदी आहे. पण जोपर्यंत अशा तक्रारी घेऊन लोक पुढे येत नाहीत तोपर्यंत त्याची अंमलबजावणी करणे अवघड आहे.



## गर्भलिंगनिदानाबाबत काही समज–गैरसमज

एखाद्या समाजात मुलींची संख्या कमी आहे किंवा खालावत चालली आहे हे कसे ठरवायचे?

निसर्गाच्या नियमानुसार, १००० मुलांमागे ९४०–९५० (जास्त अचूक म्हणजे ९५२) मुली जन्माला येतात. आपल्या भागात १००० मुलांमागे प्रत्यक्षात किती मुली जन्म घेतात, हे आपण शोधले तर आपल्याला जन्माच्या वेळचे लिंग गुणोत्तर **(Sex Ratio at Birth)** मिळू शकेल. ०–६ वयोगटासाठी १००० मुलांमागे मुलींची संख्या घेतल्यास आपल्याला बाल लिंग गुणोत्तर **(Child Sex Ratio)** मिळते. एखाद्या समाजात गर्भलिंग निवडीचे प्रमाण किती आहे हे आपल्याला जन्माच्या वेळच्या लिंग गुणोत्तरावरून जास्त अचूकपणे समजू शकते.

जनगणनेवरून देशाच्या, राज्याच्या आणि जिल्ह्याच्या पातळीवर ०–६ वयोगटातील लिंग गुणोत्तर काय आहे हे समजते तर सॅम्पल रजिस्ट्रेशन सर्व्हेतून **(Sample Registration Survey)** जन्माच्या वेळचे लिंग गुणोत्तर समजते. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारताचे ०–६ वयोगटासाठी लिंग गुणोत्तर ९२७ होते. महाराष्ट्रासाठी हे गुणोत्तर ९१३ होते. त्यातही कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण ८७८ हून कमी होते.

एसआरएसच्या आकडेवारीनुसार सन २००६–२००८ साठी महाराष्ट्राचे जन्माच्या वेळचे गुणोत्तर १००० मुलांमागे ८६९ मुली इतके कमी झाले आहे. यातून राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात गर्भलिंगनिदान होत आहे, हे स्पष्टपणे दिसून येते.

## गर्भलिंग निवड कायद्याने गुन्हा आहे का?

सन १९९४ चा गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र वापर (गर्भलिंग निदान प्रतिबंध) या कायद्यानुसार गर्भलिंगनिवड गुन्हा आहे. सोनोग्राफीसारख्या तंत्राचा वापर गर्भाचे लिंग जाणून घेण्यासाठी केला जाऊ नये म्हणून हा कायदा अस्तित्वात आला. या कायद्यानुसार पहिल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत कैद आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा होऊ शकते. परंतु या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकलेली नाही आणि त्यामुळे थोड्याच लोकांना शिक्षा होऊ शकली आहे. गुन्हा सिद्ध करणे हेच यात सर्वांत मोठे आव्हान आहे. कारण गर्भलिंग निदान उघडपणे होत नाही आणि बहुधा दोन्ही पक्षांच्या संमतीने घडत असते. त्यामुळे तक्रार कोण दाखल करणार, असा मुद्दा येतो.

## पण गर्भपाताला कायद्याने मंजुरी आहे ना?...

हो. १९७२ चा वैद्यकीय गर्भपात कायदा विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करण्यास मंजुरी देतो. उदा. आईच्या किंवा होणाऱ्या बाळाच्या जीवाला धोका असल्यास, बलात्कार झाला असल्यास किंवा गर्भनिरोधक निकामी ठरल्याने दिवस राहिले असल्यास गर्भपात करता येतो. परंतु हा कायदा गर्भलिंग निवड करून नंतर केलेल्या गर्भपाताला परवानगी देत नाही.

## महाराष्ट्रातील स्थिती

गर्भलिंग चिकित्सेविरुद्ध कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्रात १९८८ मध्ये हा कायदा लागू करण्यात आला.

या कायद्यानुसार गर्भलिंग निदान करणे हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा आहे.

## कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये

- गर्भधारणेपूर्वी आणि नंतर लिंगचाचणीवर बंदी आहे.
- भ्रूण लिंगपरीक्षणासाठी (गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व चाचणी) तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगावर बंदी आहे.
- भ्रूण लिंग माहितीसाठी किंवा परीक्षणासाठी तंत्रज्ञान वापराच्या जाहिरातीवरही बंदी आहे. यामध्ये इंटरनेट माध्यमाचा समावेश आहे.
- भ्रूण लिंग चाचणी (गर्भधारणापूर्व किंवा प्रसूतिपूर्व चाचणी) करणाऱ्या केंद्रासाठी नोंदणी बंधनकारक आहे.

'फॉर्म-एफ'सह विहित नमुन्यात संबंधित माहिती संकलन आणि माहितीच्या रेकॉर्डचे संवर्धन बंधनकारक आहे.

## काही प्रकरणांमध्ये सशर्त अनुमती

काही विशिष्ट प्रकरणांमध्ये गर्भनिदानाला सशर्त अनुमती देण्यात आली आहे. त्यात प्रामुख्याने आनुवंशिक विकलांगपणाची शक्यता, लिंगविषयक रोग यांचा समावेश आहे. तसेच ज्या महिलेचे वय ३५ वर्षांहून अधिक आहे, जिचा दोनपेक्षा अधिक वेळा गर्भपात झाला आहे किंवा गर्भवती महिलेला रेडिएशन, संसर्ग अथवा रासायनिक बाधा झाली आहे, तर अशा प्रकरणांत संबंधित सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र असल्यास सशर्त गर्भनिदानास अनुमती देण्यात येते.

## ...तर केंद्रावर गुन्हा

गर्भजलचाचणी, आठ आठवड्यांचा गर्भ (५६ दिवस) व अर्भकाचा जन्म या तिन्ही स्तरांवर या कायद्याद्वारे लक्ष ठेवले जाते. सर्व सोनोग्राफी सेंटर, जेनेटिक कौन्सिलिंग सेंटर आणि लॅबोरेटरी या कायद्याच्या कक्षेत आणून त्यांना नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यांची देखरेख करणे व तपासणी करणे याचा त्यात समावेश आहे. या केंद्रांनी कायद्याचा भंग केला, तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

## अंमलबजावणी समित्या

या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेत विविध समित्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात केंद्रीय पर्यवेक्षक समिती असून, त्याच्याअंतर्गत राज्यस्तरीय पर्यवेक्षक समिती व राज्य समुचित प्राधिकारी, जिल्हा समुचित प्राधिकारी व तालुका समुचित प्राधिकारी हे टप्पे आहेत. केंद्रीय मूल्यमापन व तपासणी समितीच्या खालोखाल राज्य सल्लागार समिती, जिल्हा व तालुका सल्लागार समिती आहे. तसेच राज्य मूल्यमापन व तपासणी समिती आणि जिल्हा मूल्यमापन व तपासणी समिती नेमण्यात आली आहे.

## शिक्षा कोणाला?

- या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रांवर व डॉक्टरांवर तसेच त्याची सेवा घेणाऱ्या कुटुंबांवरही गुन्हा दाखल होऊ शकतो.
- गर्भवती महिलेची गर्भनिदान चाचणी करण्यासाठी सोनोलॉजिस्ट, अल्ट्रासॉनिक क्लिनिक अथवा लॅबोरेटरीचा वापर करणाऱ्या व्यक्तीला, स्त्रीरोगतज्ज्ञ किंवा डॉक्टरला पहिल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत शिक्षा आणि ५० हजार रुपये दंडाची तरतूद आहे.
- 'भारतीय पुरावा कायदा, १८७२'मधील तरतुदीचाही या ठिकाणी वापर केला आहे. या कायद्याच्या कलम २४नुसार महिलेला तिचा पती अथवा नातेवाइकांनी

गर्भनिदान चाचणीसाठी सक्ती केल्याचे गृहीत धरण्यात आले आहे. त्यामुळे गर्भनिदान चाचणीसाठी प्रवृत्त करणाऱ्यांवरही फौजदारी खटला भरण्याची तरतूद आहे. कलम २५नुसार कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या अशा व्यक्तींवर तीन महिन्यांची शिक्षा व दंड ठोठावण्याची तरतूद आहे.

- हा गुन्हा दखलपात्र, अजामीनपात्र व दंडात्मक आहे. अशा प्रकरणात सद्हेतूने कारवाई केली गेली, तर अशा परिस्थितीत कारवाई करणाऱ्या पोलिसांवर खटला भरता किंवा दावा दाखल करता येणार नाही.

## कायद्यांतर्गत शिक्षेची तरतूद

डॉक्टर्स/रुग्णालयाच्या मालकांसाठी –

प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांसाठी कारावास आणि १० हजार रूपयांपर्यंत दंड.

दुसऱ्यावेळी केलेल्या गुन्ह्यासाठी पाच वर्षांपर्यंत कारावास आणि ५० हजार रूपयांपर्यंत दंड.

आरोप निश्चित झाल्यानंतर डॉक्टरांच्या वैद्यकीय परवान्याचे निलंबन.

प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी राज्य वैद्यकीय परिषदेद्वारा पाच वर्षांसाठी वैद्यकीय परवाना रद्द करणे.

त्यानंतर केलेल्या गुन्ह्यासाठी वैद्यकीय परवाना कायमचा रद्द करणे.

गर्भवती महिलेचा पती/कुटुंबातील इतर सदस्य किंवा इतर व्यक्तींद्वारा लिंग चाचणी करण्यासाठी प्रेरित केल्यास –

प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत कारावास आणि ५० हजार रूपयांपर्यंत दंड.

त्यानंतर केलेल्या गुन्ह्याला पाच वर्षांपर्यंतचा कारावास आणि एक लाख रूपयांपर्यंतचा दंड.

जोपर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत गर्भवती महिला ही निर्दोष असल्याचे मानले जाईल.

## कायद्याच्या अंमलबजावणीची पद्धत

- विविध स्तरांवर समुचित प्राधिका–यांची नियुक्ती करणे.
- राज्यस्तरीय पर्यवेक्षकीय मंडळाची स्थापना.
- राज्य सल्लागार समितीची स्थापना.
- तपासणी व सनियंत्रण समितीची स्थापना.
- विशेष कक्षाची स्थापना.
- जिल्हास्तरावर दक्षता पथकाची स्थापना.
- समुचित प्राधिकाऱ्यांद्वारे सोनाग्राफी केंद्रांची नियमित तपासणी
- बनावट (डमी) केसेस शोधणे
- कायद्यातील तरतुदींचा भंग केल्याचे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही.

- राज्यस्तरीय पथकामार्फत अचानक भेटी.
- सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्र यांची धडक तपासणी मोहीम.
- जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये जन्माचे वेळीचे लिंग गुणोत्तर प्रमाणाचा आढावा.

## आरसीएच 'पीआयपी'अंतर्गत पूरक योजना

- राज्यस्तरीय कक्षाची स्थापना
- राज्यातील समुचित प्राधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा
- स्टिंग ऑपरेशन (बनावट केस) करण्यासाठी साह्य
- पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत कोर्ट केसेसमध्ये साक्षीसाठी जाणाऱ्या साक्षीदारांना साह्य
- सोनोग्राफी केंद्राच्या तपासणीसाठी जिल्हा स्तरावर पथकांची निर्मिती
- जिल्हास्तरावर जिल्हयातील समुचित प्राधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा
- पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या केंद्राची माहिती देणाऱ्या व्यक्तीस बक्षीस योजना
- जिल्हास्तरावर पीसीपीएनडीटी कक्षाची स्थापना
- राज्य व विभागीय स्तरावर टेहळणी पथकाची स्थापना
- राज्यस्तरावर हेल्पलाइन (हेल्पलाइन क्र. १८००२३३४४७५) कक्ष कार्यान्वित
- राज्यस्तरावर **www.amchimulgi.gov.in** या संकेतस्थळाची निर्मिती व त्यावर आलेल्या तक्रारींचे निवारण

## उल्लेखनीय कामगिरी

- सोनोग्राफी आणि इमेजिंग मशिन निर्माते, वितरक यांना राज्य समुचित प्राधिकाऱ्याकडे नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.
- सोनोग्राफी आणि इमेजिंग मशिन निर्माते, वितरक यांनी जुने मशिन खरेदी करून नवीन मशिन विक्री करताना राज्य समुचित प्राधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक राहील.
- राज्य समुचित प्राधिकाऱ्यांकडील नोंदणीकृत व्यावसायिकांकडून सोनोग्राफी मशिन खरेदी करणे बंधनकारक राहील.

## कायदा नेमके काय सांगतो?

- गर्भधारणेपूर्वी किंवा गर्भधारणेनंतर गर्भलिंग निवडीवर बंदी व अनुवंशिक विकृती

शोधण्यासाठी असलेल्या तंत्रज्ञानाचा पोटातील गर्भ मुलगा आहे की मुलगी याची तपासणी करण्यावर बंदी.

- पोटातील गर्भाचे लिंग माहिती करून घेऊन गर्भपात करण्यास बंदी.
- गर्भलिंग निवड आणि लिंग निश्चिती तंत्राची जाहिरात करण्यावर बंदी.
- कायद्यातील तरतुदींचा भंग करणाऱ्यांना शिक्षा.
- या कायद्यातील सर्व गुन्हे दखलपात्र, अजामीनपात्र व आपापसांत न मिटवता येणाऱ्या स्वरूपाचे आहेत.
- कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर समुचित अधिकाऱ्यांची व जिल्हा सल्लागार समितीची नियुक्ती
- राज्यस्तरावर राज्य पर्यवेक्षकीय मंडळ, राज्य सल्लागार समिती, राज्य देखरेख व मूल्यमापन समितीची नियुक्ती.

ज्या ठिकाणी सोनोग्राफीचे मशिन आहे त्या ठिकाणी संबंधित दवाखान्याने किंवा व्यवस्थापनाने पुढील गोष्टींची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

- सोनोग्राफी मशिन, केंद्राची जागा यांची नोंदणी केलेले प्रमाणपत्र दर्शनी भागात लावलेले असावे. कोणतीही नोंद न झालेले मशिन जप्तीस पात्र असून मशिनधारकास कायद्यानुसार शिक्षा होऊ शकते.
- नोंदणीकृत जागा सोडून मशिन इतरत्र वापरण्यास बंदी आहे.
- कोणत्याही सोनोग्राफी तज्ज्ञास दोनपेक्षा जास्त केंद्रांसाठी कार्यरत राहता येणार नाही.
- नोंदणी शुल्क एका केंद्रातील एका सुविधेसाठी २५ हजार रुपये, तर एकापेक्षा जास्त सुविधेसाठी ३५ हजार रुपये इतके असेल.
- मशिन, सोनॉलॉजिस्ट किंवा जागेचा बदल बाबतीत समुचित प्राधिकरणास ३० दिवस आधी कळविणे बंधनकारक आहे.
- वेटिंग रूम, ओपीडी, सोनोग्राफी मशिनच्या शेजारी 'येथे गर्भलिंग तपासणी केली जात नाही' असा फलक लावायला पाहिजे.
- डॉक्टरांकडे या कायद्याची इंग्रजी भाषेतील व स्थानिक भाषेतील प्रत असायला हवी.
- सोनोग्राफी मशिन वापरण्यासंबंधीचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध असावे.

## या कायद्यांतर्गत शिक्षेची तरतूद

- जर संबंधित डॉक्टरवर या गुन्ह्याचा आरोप पहिल्यांदाच होत असेल, तर त्या डॉक्टरला तीन वर्षांपर्यंत कैद; दहा हजार रुपयांपर्यंत दंड आणि मेडिकल

कौन्सिलमधील नोंदणी निलंबन

- परत गुन्हा केल्यास संबंधित डॉक्टरला पाच वर्षे कैद व ५०,००० रुपयांपर्यंत दंड, कायमस्वरूपी नोंदणी रद्द
- लिंगनिवडीसाठी दबाव आणणाऱ्या व्यक्तीस तीन वर्षांपर्यंत कैद; ५० हजार रुपयांपर्यंत दंड

या कायद्याखाली सदर गर्भवती महिला निर्दोष आहे, असं गृहीत धरलं जातं. कोणत्याही परिस्थितीत गर्भलिंग निदान करणाऱ्या स्त्रीला आरोपी केले जाणार नाही.

## कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समितीची रचना

या कायद्यांतर्गत समुचित अधिकारी आणि सल्लागार समिती यांच्याविषयीचे नियम घालून देण्यात आले आहेत. सरकारी गॅझेटमध्ये त्याची प्रसिद्धी करून एक किंवा अनेक समुचित प्राधिकारी नेमण्याची सरकारची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात सिव्हिल सर्जन व ग्रामीण आरोग्य केंद्राचे अधीक्षक, तसेच महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी हे या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नेमण्यात आलेले समुचित प्राधिकारी आहेत. या समुचित प्राधिकाऱ्यांना कायद्याच्या अंमलबजावणीत मदत करण्यासाठी त्यांच्यासह सात सदस्यांची सल्लागार समिती आहे. त्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील ३ सदस्य, स्त्रीरोगतज्ज्ञ, प्रसूतिशास्त्रतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, जनुकीय तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, माहिती अधिकारी, तीन सामाजिक कार्यकर्ते (महिला संस्थांना प्राधान्य) असावेत. अशी एकूण रचना आहे. या सल्लागार समितीची बैठक दर दोन महिन्यांनी होणे बंधनकारक आहे. सल्लागार समितीच्या सल्ल्यानुसार समुचित अधिकाऱ्यांनी कायद्याची अंमलबजावणी करायची असते. सल्लागार समितीच्या मदतीने संपूर्ण जिल्ह्याच्या केंद्रांची तपासणी यंत्रणा उभी करायची असते.

## तक्रार कोणाजवळ दाखल केली जाऊ शकते?

राज्य सरकारने नियुक्त केलेल्या राज्य पातळीवरील, जिल्हा किंवा उपजिल्हा पातळीवरील समुचित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करता येते. उदाहरणार्थ जिल्हा पातळीवरील जिल्हा शल्यचिकित्सक, तर शहर पातळीवर मुख्य वैद्यकीय अधिकारी किंवा प्रभाग आरोग्य अधिकारी आणि ग्रामीण भागात ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक.

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायदा सोनोग्राफी सेंटर/जनुकीय प्रयोगशाळा/जनुकीय समुपदेशन केंद्रे कशी तपासावीत?

- सोनोग्राफी केंद्राच्या दर्शनी भागात आणि सोनोग्राफी रूममध्ये 'गर्भलिंगनिदान करणे गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा आहेस' असा मजकूर लिहलेला आणि शिक्षेची तरतूद सांगणारा बोर्ड लावलेला आहे का?
- नोंदणी प्रमाण पत्रात नमूद केल्याप्रमाणे सोनोग्राफी यंत्रांची संख्या योग्य आहे का?

- सोनोग्राफी प्रशिक्षित तंत्रज्ञच करतात का?
- समुचित अधिकारी व सल्लागार मंडळ त्यांच्या विभागातील सोनोग्राफी केंद्रांना भेटी देतात का?
- सोनोग्राफी केलेल्या सर्व गर्भवती महिलांचे 'एफ' फॉर्म नियमानुसार माहिती भरून केंद्रात ठेवण्यात आले आहेत का?

अशा प्रकारच्या निरीक्षणातून सदर समुपदेशन केंद्रे तपासता येतील.

आपल्या भागात सोनोग्राफी तपासणीतून गर्भाचे लिंग कोणी सांगत असेल, तर आपल्या जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जनकडे तक्रार द्या. शहरी भागात नगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या समुचित अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवा.

## समाजजागृतीची गरज

शेवटी कितीही कडक कायदे केले, तरी समाजात या मुद्द्यावर जोवर जागृती होत नाही, तोपर्यंत स्त्री–भ्रूणहत्येसारखे प्रकार घडतच राहणार. त्यासाठी स्त्री–पुरुष समानतेचे बीज लहान वयापासूनच मुलांमध्ये पेरले पाहिजे. मुलग्याप्रमाणेच मुलगीही सर्व क्षेत्रांत कर्तृत्व गाजवू शकते, हे आज सिद्ध झाले आहे. मुलींचे समाजातील प्रमाण धोकादायकरीत्या कमी होत चालले आहे. याचे परिणाम काय होतील, हे सांगायला नको. ही भयावह स्थिती टाळायची असेल, तर मुलीला तिचा जन्मायचा हक्क मिळायलाच हवा. त्यासाठी गर्भलिंग चाचणी टाळायला हवी. स्त्री आणि पुरुष समानता खऱ्या अर्थाने अस्तित्वात आली, तरच देशाची प्रगती होऊ शकेल, यात वाद नाही.

# महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

महिला आपल्या संरक्षणासाठी, अन्याय होत असताना मदत मागण्यासाठी या ठिकाणी फोन करू शकतात.

**राज्य महिला आयोगाची 'सुहिता' हेल्पलाइन**
०२२–७४७७७२२४२४

**महिलांसाठी स्वतंत्र पोलिस हेल्पलाइन, पुणे**
०२०–२६०५०१९१ (www.punepolice.gov.in )

**पुणे नियंत्रण कक्ष**
०२०–२६१२६२९६

**पुणे महिला साह्य कक्ष**
०२०–२६२०८३४१

**पुणे सखी हेल्पलाइन**
०२०–२४४८४५३५

**आय लव्ह मुंबई आणि सकाळ**
८८८८८०९३०६

**पुणे गुन्हे शाखा कक्ष**
०२०–२६११२२२२, २६२०८२९५

**हेल्पलाइन**
१८१

**स्त्री सन्मान हेल्पलाइन**
०२२–८८८८८०९३०६

**नवी दिल्ली हेल्पलाइन**
१८२

# आयोगाची घटना, अधिकार व कर्तव्ये

भारताच्या राज्य घटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषतः राज्य घटनेच्या कलम ३८,३९, ३९–ब, ४२–ब मध्ये अंतर्भूत केलेली राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

## आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- राज्य घटना व अन्य कायदे या नुसार महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे
- त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंमलबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे
- स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे
- संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

## आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे
- आयोगाला खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील
- राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे
- कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे
- शपथपत्रावरील साक्षी, पुरावे स्वीकारणे
- कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे
- साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी राजादेश काढणे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

## आयोगाचे उपक्रम

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- महिलांविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहीम राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- राज्यातील कारागृहांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- आयोगासमोर सुनावणी घेणे
- जनसुनावणी घेणे
- सरकारला महिलांविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
**दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८**
**'सुहिता' हेल्पलाइन – ७४७७७२२४२४**

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com